दिंडी - रत्नांचे स्तंभ जेथे शालीमित अस्त्रे शुभ्र शय्या तशाची

सौवर्णी दांत मंच स्फटिक भर कुर्ती शोभती भिंति काची

रत्नांचे दीप तैशी मृदुल अयस्रणमुन्नु लंबी वितानें

ऐशा तो इंद्र सद्मा सम निज भवना पाहुनी बीज हेतु जाणे ९

पद- सत्यीच दुर्भगीनित्य दीसुद्दी मम हृद्दी कारण
यदुनमाच्या कृपाकटाक्षा वाचुनि अन्चन. ॥ध्रु॥
आप्तकाम हा श्रीपति सरवा मम समक्ष न बोलुनी
सन्काम
(याचक भक्ता देतो बहु परि मानी लघु त्या मनी
तैसे भक्त अल्प दिले तरी त्यात बहु मानितो
यास्तव माझी पृथुकमुष्टी प्रेमे स्वीकारीतो


भक्ती
चाल- जन्मो जन्मी त्याच्यीच असो दास्य प्रीती
त्या आनन कामज मायिक वीभूती
घडो लत्सेवेत त्युर प्रसंगती
टीप- धनिपुरुषा चा मद्दोद्भवाने अधःपात पाहुन
लघुज्ञ भक्ता विचक्षण प्रभु तो सेपत्ती देईन
मूढमला परि भक्ति अभाव धन वांछ घुष्म
दिले आता तरी कृष्णदासा देवा भक्तिच श्याम

दिंडी- अशारीतीनें परमभक्तसुदामा
करुनि निश्चयमोन मागितयाप्रेमा (हरिसि)
त्यागी विषयां भोगुनी सति तजोये
अनासक्तहृदयीं (भनि) कृष्णकृष्णागाये

ओवी- जो ब्रम्हादिकांचा देवना, सर्व यज्ञीं फलदाता
ऐश्या सर्वेश्वरा श्रीअनंता, विप्रावांचुनी देवनसे

(श्लोक) (तस्यैव देव देवस्य हरेर्यज्ञपतेः प्रभोः
ब्राम्हणाः प्रभवो दैवं नतेभ्योविद्यते परम्)

आर्या- भगवन्मित्रसुदामा पावुनि ऐसास्वभक्तवशआजिता
तद्ध्यानेंत्रुटितबंध होऊनि गेला स द्रुति तत्पादा (कृष्णपदा)
" ब्रम्हण्यदेव हरिचो जाहीं द्विजभक्तिमात ऐशी
तो पावुनि तच्चरणीं प्रेमा भवसिंधु पार उतरोत ॥



श्रीशानेश्वरमाऊली समर्थ

॥ अनन्य शरण रिघा ॥ हरीला ॥ तारक तो जगदीश्वर ~~आधु~~ जाणुने ॥
॥ कास धरा विश्वास तयाचा, देणार नाही दगा ॥ अनन्य.
॥ ठेवुनियां कर दोन्ही कटावरी, भक्तासि भेटे उगा ॥ अनन्य
॥ त्र्यंबक टोऊाने साधन करितो एकाजनार्दनी ॥ ॥ अनन्य

१ जय जय राम कृष्ण हरी

२ ज्ञानेश्वर माउली वो माय माझी ज्ञानेश्वर माउली वो
कोमल सुंदर परम मनोहर हृदयी ठेवी पाउली वो
त्रिविध तापसंताप हरायास हेना करि करुणा साउली वो
घेउनि मजला निज मांडीवर स्नेहे पान्हावली वो
अलकावतीपतिनं दीनी विनवणी श्रवण करुनि वानविली वो

३ गणराया लवकर येई

४ भज राधाकांत

५ धाव विभो करुणाकर

६ भावधरा रे

॥ श्रीज्ञानेश्वरमाऊलीसमर्थ ॥

श्लोक- सांगे कथा शुक भवांबुधिते नराया
कीं कालिया-हृद असे यमुनेत राया
जैसे कुटुंत कढते जळ अग्नितापे
तैसे -हृदोदक भुजंग विष-प्रतापे

श्लोक- उसळे सळसळा जळ डोळी
त्यावरी खगन रोके उडोली
अंतरिक्षगत पक्षि जळोनि
ऊर्ध्व ऊर्ध्व पडताती गळोनि

श्लोक- श्रप्यमाण पया यस्मिन् पतंत्युपरिगाः खगाः
विक्षुब्धमता विषोदोर्मि मारुतेनाभिमर्षिता:
म्रियंते तीरगाः यस्य प्राणिनः स्थिर जंगमा:

२

अभंग- वैकुंठनायक तेयवनीआला ॥ गोपाळांचीमेळाबरोबरी
साकी- येवु समे बोलिरामबिना हरि गोवनकु संभजावे
चलतच्चलतवत जमुनाजो कुतीर ग्वाळ मिळआवे
श्लोक- अथ गावश्च गोपाश्च निदाघातप पीडिताः
दुष्टं जलं पपुस्तस्याः तृषार्ता विषदूषितं
आर्या- ते गोप पशुहि विषजल पीतीमरती तटींचे तत्काळ
ते पाहता कृष्ण कुरुणानिधि सत्पती असन्काळ
आर्या- बाभोलिगाई ते उठवी पाहे दयार्द्र दृष्टीने
पूर्वीजिसे दशवदन रणहत कपिकटक अमृतवृष्टीने
श्लोक- ते संप्रतीत स्मृतयः समुत्थाय जलांतिकात
आसन् सुविस्मिताः सर्वे वीक्ष्यमाणाः परस्परम्।
अन्वमंसत तद्राजन् गोविंदानुग्रहेक्षणम् ।
आर्या- सुच्छद भये उपाल सौभरि वर निर्भयस्थळी सर्प
वसतो होता तुनेटा दवडावाया तुनिही विषदर्प
अभंग- याडिया बा करि दिधला सित्रास (करीन मी वध तुझा आता
(आर्या: देव असे मनि आणि हृद तट जवदंब नग शिरी वेघे
जे पूर्वी अमृततरद्विज पादरुजा शिआश्रयादे घे)
श्लोक- ते जई विहगराज सुधेते
पावला गरुड या वसुधेते
त्या तरुवरि तसा बसला हो
धेतई द्रुम सुधावस लाहो

3

साकी- कुदंब रुखपर चढे किसनजी अंबर पीत सवारे
तबही देखो गगन मंडलमो बिखरे उडत पुवारे
चढे किसनजी
" - कदंबकु रुखपर कोहिकु वसनन सवारे
कोहकु माला छोड दई अब पूछत दासीतसवारे
" - कूदत है हम जमुनामो अब भुजंग सीस उडावू
काज लिहारे सुनो ओ पजी ब्रिजमो नंद बाबाबू
" - कहियेजा वकुर बिनती इतनी राधाको कानन मो
पीतरखो हम काज ब्रिजनकु डुबगये जमुनासे
पद - जलमे मतुम मतजय्ये । किसनजी जलमे तुम मतजय्ये
नंद जशोदा बलीरामकु हरि खबर क्याकहिये। किसनजी
तुमबिन हम सब गोपगवाल नरोय रोयमर जइये किसनजी
जीवनसुत प्रभु बिनती इतनी दासनकी सुन लइये। किसनजी

श्लोक- प्रचंड डावा भुजदंड भारी
सव्ये करे वाजी विकेटभारी
गर्जेनि वृक्षान्चवरी तटाकी
उडी विषान्च्या सोळबोल टाकी
श्लोक- पाणी घनुष्यत उंच बळे हदान्चे
त्यान्चे असे विषाच्चि तुंबळ त्याहृदान्चे
कल्लोळ वळे बभयकारकु य तटाका
आश्चर्य हे जरि गमेल मनात टाका

श्लोक तस्य ह्रदे विहरते भुजदंड घूर्ण
वाघोष मगवर वारण विक्रमस्य

आश्रुत्य तत्स्वसदनाभिभवन्नीरीक्ष्य
चक्षुःश्रवाः समसन तद्दृश्यमाणां =

श्लोक - कर्णहीन नयनी ध्वनि घेतो
क्रुद्ध होवुनि भुजंग नि घेतो
देखिले डुडुले स्वपलाळा
लो विखार हृदयात जवाळा

श्लोक - तं प्रेक्षणीय सुकुमार घनावदातम्
श्रीवत्स पीतवसनं स्मितसुंदरास्य
क्रीडितमप्रतिभयं कमलोदराक्षं
संदश्य मर्मसु रुषा भुजया च छाद

आर्या - यमजे विक्राळ पाशी मर्कंडेयासि नाम भूमाने
बोधी बोधाव्या प्रभुवर्या प्रेमभक्तियोगाने

श्लोक - भुजंगे हरी वेष्टिला सर्व देही
न हाले न चाले न कांही वदेही
असे देखतां सर्व मूर्छित जाती
महा दुःख शोकें भयें ओपजाती

अभंग - गाई रडताती वत्स पडताती कृपाळा पीडिती आयु
वियोगाने तेव्हां पक्षी रडताती। आता कृष्णमूर्ती कैंची आम्हा।
(सांगती)

श्लोक - मूर्च्छा विमानी गगनी सुराळा।
आक्रांत गाई व्रजवासराळा।
आक्रंदती वत्स मुरेनयकी मांडिती रोदनाते
देखोनि हे से मधुसूदनाते

ओवी- यमुनेसी झाला वृत्तांत । गोकुळात काय वर्तलीमात
दुश्चिन्हे परम अद्भुत । जाणविली लोकाते

श्लोक- तं दुर्निमित्तं निधनं मत्वाप्रासमतद्विदः
तत्प्राणास्तन्मनस्काः स्तेदुःखशोकभयातुराः

आर्या- तेव्हां मानधवा बुनिकि कवती नंदा दिवसी गोगळी
उधडेचि धांवति जन गोकुळातून एकवटले पशुही

साकी- चला चला उनन्या गोपजो मान जातकान्नदा
डुबा कुन्हेया डुबा कुन्हय्या भाग्य जरयां विजनदा

पद- कृष्ण गडी आपुला गडेलो यमुनाडोहि बुडाला
का वियाडसे कृष्ण आला । तो दिवस विळाधा दाईला
टीका मारित आपुल्याला । कृष्ण तीरस्वस्थ न बसला

अता कोण सोडविल त्याला । यमुनाडोहि बुडावाला
गाई त्यावीण हंबरती । वासरे स्तनपान न करिती
याप्रकारे सर्व रडती । दुःखाने कृष्ण कृष्ण म्हणती
आता काय भेट आपुल्याला । यमुनाडोहि ०
यशोदा नंदाहि मूर्छित पडती । यांकुनी नित्य पुन्हा उठती
कोणी कोणा ना वरती । कृष्णकपसुदाने चाळकारेती
सीमानाहि प्रेमाला । यमुना डोहि बुडाला ।

श्लोक- आबाल वृद्धवनिताः सर्वे गोपपुरुषास्तथा
निर्जग्मुः गोकुलाद्दीनाः कृष्णदर्शनलालसाः

अभंग- गोकुळीचे जन निघाले सकळ । पाहती गोपाळ वनामध्ये
यशोदा व्याकुळ झाली असप्राण । सुखी असो तान्हे वनामध्ये ॥

श्लोक- परम वृद्ध बहू (वळे कटी
धरुनि यष्टि करी-यति संकटी
त्वरित चालोनि बाळ हे रांगती
हरिच ज्या सुपथि सकळां गती

श्लोक- तांस्तथा कातरान् वीक्ष्य भगवान् माधवो बलः
प्रहस्य किंचिन्नोवाच प्रभावज्ञोऽनुजस्य सः

श्लोक- तैस्तत्र नाभ्यवांकुशाशनि-
ध्वजोपपन्नानि पदानि विष्णोः
मार्गे गवामन्य पदान्तरान्तरे
निरीक्ष्यमाणा ययुरंगसत्वराः

श्लोक पावलेना हि तयीं व्रजवासी
अंतरी धरुनि ती व्रजवासी
आमुकुंदभव बंध हरीती
देखिला भुजग बंध हरीती

श्लोक- न दिसती मूर्छित गोप सारे
राया हरी देखियला असारे
आक्रंदती ~~माई ती~~ वत्स खुरेल ठाकी
नेत्रोदके तो पशु वृंद ठाकी

श्लोक कृष्णप्राणान्निर्विशतो नंदादीन् वीक्ष्य तं ह्रदं
प्रत्यषेधत्स भगवान् रामः कृष्णानुभाववित्

अभंग- अंतर्यामी जाणे जन म्हणो वेडे
नामा म्हणे येढे म्हणिये ते ।
आर्या- गरळमदांध खळ भुजगभोगी निबद्ध जो गदे वतो उग्र
टोलाविले भूमि तसा मग भगवाने भोगबंधनी पुरता
श्लोक- क्षणभरी जोर हटेन सूटला
तटलया रवांचि स्व रुचि लूटला
बळ असे वृत्तले खळखळ खळसल्या
दुरनि वाईसितसे पुरु पालाया
आर्या तेज विषाचे नच्चाले परि कुरि फूत्कार फारसे नाम
धावे धरावया लोचु कूबु मिआणी पुन:२ राम
आर्या - वाल्मीरामता दुष्ट भुभवुनि बळु वेळ फार भागविता
प्रभुने अनीतिवती विषधन मद मत्त नाग नागविला ।
ओवी - शिरसि पाय ठेवि चो भगवान । पुच्छ धरिले वाम हस्ते
तांडव नृत्य जगन्नाये । आरंभिले तेधवां ।
अभंग - त्याचिये मस्तकी नाचे नारायण ।
आरंभी गायन जगदीश
ये लोकांच्या भार घालवि हूबी कुरी ॥
दमीत दुष्टासी स्वामी माझा । ते व्हा त्या स्त्रिया करिता तीस्तुती
यच्चूड़ कोरीन मलङ्क शैले श्रोणरल्लन्नम मदेश्वर दंड धरा पाने :
क्षीणायुषो भ्रमत उल्बण मास्यतो अुड़ुनरक्ता वमन परमवृद्धमलमापन्नाः

त्याच्यापत्नी कृपामुखा

श्लोक - अनुग्रहोयं भवतः कुतो हि नो
ह्यङ्गस्ततो ने कुतीकुलिबर्यापः
यद्दंडयुक्तत्वमुष्येदे हिनः
क्रोधोपि तेनुग्रह एवसंमतः

श्लोक - तपः सुतप्तं किमनेनपूर्वं
निरस्तमानेनानच मानदेन
धर्मश्चवा सर्वजनानुकंपया
यतो भवांस्तुष्यति सर्वजीवः

श्लोक - अन्यायकेले जरिबाळकाने
क्षमाकरावी जगपालकाने
दुन्यायबापा स्थिर जंगमाचा। अन्यायहा सोडि भुजंगमाचा।

श्लोक - मूढमूर्ति अजि या भुजगाची
शौतिबा माउलीच तू त्रिजगाची
हान चुके अपराध वराया।
रक्षणेसन चुके सुरराया।

पद - तुमकासरनसरन महाराज।

हम गरीबा तुम सब गरीबोनके भक्तवत्सल महाराज। तुमका-
मांगत हूं हम पतीना नको भिक्षा देवो आज। तुमको-
मानपुरी प्रभू कहत कामिनी राखो हमारी लाज। तुमको

ऐशी भाकिता करुणा । कृपाऽपजली वज्रभूषणा ॥
पुरेंकरुनी कालिया मर्दना । भक्ताच्या वचना पाळिले ॥ ५

श्लोक - कुब्जजी अ स्तुति कोप अहाच
प्राण की त्यजि भुजंगम टाळ
दासतो तनु रावा समयाची
आस रे तुका च्या समयासी

आर्या - नमिता न्रसमतोय स्तविताकोपम भूत्कजीपाठ्
ओळिता म्हणे रमण कुद्वीपाला रहकुटुंब जावी टिळ

श्लोक - द्वीपं रमणकं हित्वा ह्रदमेतमुपाश्रितः
~~[illegible]~~ यद्भयात्स सुपर्णस्त्वां नाद्यात्मत्पदलांछि
पूजयित्वा जगन्नाथं प्रसाद्य गरुडध्वजं
सकलत्रसुहृत्पुत्रो द्वीपमब्धेर्जगाम ह ॥

॥ श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

श्लोक - सांगे कथा शुक भवांबुधि ने तराया
कीं कालिया ह्रद असें यमुनेत राया
जैसें कढेंत कढत जंव अग्नि तापे
तैसें ह्रदोदक भुजंग विषप्रतापे ॥

श्लोक - श्राप्यमाणपयायस्मिन पतन्त्युपरिगाः खगाः
विप्रुष्मता विषोदोर्मि मारुतेनाभिमर्षिताः
म्रियंते तीरगाः यस्य प्राणिनः स्थिरजंगमाः

अभंग - वैकुंठनायक तये वनीं आला । गोपाळां चमेळा बरोबरी

साकी - एक समै बलिराम बिना हरि गौवन के संग जावे
चलत चलत वह जमुनाजी के तीर ग्वाल मिल आवे

आर्या - ते गोप पशु हि विषजलपीतमरतो तटींच तत्काळ
तें पाहतां कुबेवे करुणानिधि सत्पती असत्काळ

आर्या - बाळें ते गाई ते उठवी पाही दयार्द्र दृष्टीने
पूर्वी दशवदन रणहत कपिकटकु अमृतवृष्टीने.

श्लोक - ते संप्रतीतस्मृतयः समुत्थाय जलान्निकात
आसन् सुविस्मिताः सर्वे वीक्ष्यमाणाः परस्परं
अन्वमंसत तद्राजन् गोविंदानुग्रहेक्षितम

आर्या - सुच्छद भये उपांचा सोभाखिर निर्भय स्थळी सेपे
वसतो होता तुनिर्हादवडावाचालुनिही विबसर्प
गो ते सिर्भु ज्यते मती नद्यी

२ श्लोक - ने जई विगराज सुधेले
पावला गरूड या वसुधेते
त्या तरुवरि नसा बसलाहो
घे नई द्रुम सुधा रस लाहो

१ साकी - कदंब रूखपर चढे किसनजी अंबर पीत सवांरे
तबही देखे गगनमंडलमें विरवसे उडत पुकारे
" - कोहको रूखपर चढे किसनजी कोहे को वसन सवांर
कोहेको माला छांड दइ अब पूं छत दास तिस बार
" - कूदत है हम जमुनामों अब भुजंग सीस उडावूं
काजु निहारे सुनो गोपजी ब्रजमों नंद बढावो
" (कहिये जाकर बिनती इतनी राधा के कानन मों
पीत रखो हम काज बिजनके डूब गये जमुनामें) ९१

श्लोक - प्रचंड डावा भुजदंड भारी
सव्ये करे वाजवि केरभारी
गर्जेनि वृक्षाच्च वरी तटाकी
उडी वि बाल्ल्या सोळळांत टाकी।

श्लोक - पाणी धनुष्यत उच्चंबळ हृदाचे
ज्याचे असे विबीच तुंबळ त्या हृदाचे
कल्लोळ लोळ भयकारक ये स्वतटाका।
आश्चर्य हे जरि गमेल मनात टाका।

पद- जलमें तुम मत जय्ये। किसनजी ॥ध्रु॥
नंदजशोदा बलीराम क, मेरी खबर क्या कीजिये ॥१॥
तुमबिन हम सब आपगवालन। शेष सरजय्ये
जीवत सुतप्रभु विनती इतनी। दासन श्री जनी ...

अनंत बलस्य किंतत
श्लोक (तस्य न्हदे विहरते। भुजदंड घूर्ण
वांधी बसमंग वरवारण विक्रमस्य
आश्रुत्य तत्स्वसदनाभि भवन्नी रीक्ष्य
चदुश्रेवाः समसरन् तदम्हव्यमाणः

(कर्णहीन नयनी ध्वनि देतो। कद्रु होउनि भुजंगनि धेतो॥
देखिले डहुळले स्वबळाला। तो विखार हृदयांत जळाला।)

श्लोक. तं प्रेक्षणीय सुकुमार घनावदातं
श्रीवत्स पीत वसनं स्मित सुंदरास्यं
क्रीडंतमप्रतिभयं कुमलोदरांद्रिं
संदश्यमर्म स्फुरुबा भुजयाच्च घाद

(आर्या- यमजे वि काळपाशी भार्की डेयासि नागभोगाने
बांधी बांधोवज्या प्रभु वर्या प्रेमभक्ति योगाने)

श्लोक (भुजंगे तरी वेष्टिला सर्वदेही
न हालेन चाले न काही वदेही)
| असे देखता सर्व मूर्छेसि जाती।
| महादुःखरोके भये ग्रप जाती

अभंग - (धाविन्नतसे वेडे दिसतसे जवी
आकोतसे कुक्षी मौडियेला
गाई रडनाती वत्स पडताती
कृपाळु प्रिये ती आपुल्यां वत्स
वियोगाने लेव्हां पक्षी रडताती
आता कृष्णमूर्ती कैंची आम्हा)

श्लोक - मूर्छा विमान गिगनी सुरां (आकांत गाई व्रजवा
सुराला ॥ आक्रंदती वत्स गुरे व्यकी ने त्रोदत्ते ते पशु वृंद यकी ५

ओवी - यमुनेसी झाला वृत्तांत । गोकुळांत काय वर्तली मात
दृष्टीस्त परम अद्भुत । जाणविती लोकाते ।

आर्या - ते वर्तमान धावुनी कळविती नंदा देवकांसि गोपगडी
उधडोन्च धावीते जन शोकात काय सुचेल तो पगडी ।

साकी - चलो चलो उत चलो गोपजी प्रानजान कान्हनका
डुबा कन्हय्या डुबा कुन्हय्या भाग जराया ब्रिजनका

~~श्लोक ...~~
~~...~~

पद गेडेहा कृष्णगडी आपुला । यमुनाडोही बुडाला हो
काबियाडे सन कृष्णाला । तोडील विष बाधा हरील ।
हाका मारित आपुल्याला । तुम्हि तरि स्वस्थपणे बसला
आतां कोण सोडवील रे त्याला । यमुना डोही बुडाला ॥१॥
गाई त्याविण हंबरती । वासरे स्तनपान न करती
यापरी गोप सर्व रडती । मुरवाने कृष्ण कृष्ण म्हणती
आला काय भेटेल आपुल्याल्या । यमुना ॥२॥

यशोदानंदहीगेलिवरिती । टाकुनीनिजवपुमटिवरती
कोणीकोणानावरती । कंठ पसरुनिशोकुकरिती
सीमानाटीप्रेमाळ । यमुनाजेटी ॥ ३ ॥

(श्लोक - आबालवृद्धवनिता: सर्वेंगपशुवृत्तय:
निर्जग्मुर्गोकुलाद्दीना: कृष्णदर्शनलालसा:)

श्लोक - परम वृद्धबहुलबले कुटी
धरुनियष्टिकरीयतिसंकटी
त्वरितचालतिबालहिरंगती
हरिचज्यासुपर्थिसकळागती

श्लोक - तांस्तथाकातरान्वीक्ष्य भगवान्माधवो बल:
प्रत्यस्यकिंचिन्नोवाच प्रभाववज्ञोनुजस्यस:

श्लोक - ते तत्र तत्राब्जयवांकुशाशनि-
ध्वजोपपन्नानिपदानिविश्पते:
मार्गेगवामन्यपदांतरांतरे
निरीक्ष्यमाणा: ययुरंग सत्वरा:

श्लोक - पांवले नींदतटी व्रजवासी
अंतरीधरुनि तीव्र जवासी
जो मुकुंद भवबंधहरीतो
देखिला भुजगबंधधरीतो

नदीतटींप्रदिक्षिनिजापसोर ।
शयाहरिदेखियला अथोर
आनंदतीवत्ससुरेतयाची
त्रैलोक्यनाथसुंदरयाची ॥

श्लोक - कृष्णप्राणान्निर्विषतोनंदादीनवीक्ष्यतदूदम
प्रत्यषेधत सभगवान रामःकृष्णानुभाववित

अभंग - अंतर्यामी ... जनप्रभो ... नाम ...

आर्या - शरणमहीधरख ... भुजग भोगी निबद्धांग देवतो उगला

आर्या - होनो ... सामग भगवान भीम बंधुनी पुंगला।

तेज ... ऐलपरिकारि कुत्सरफरतो ... धावे धरावयालोच ...

आर्या - वानराने तो दुष्ट भीमबुर्नि बाहुने ... भाग ... ला।

प्रभुने अनीतिवती विबाधतं मदमर्दन ... गोला।

ओवी द्वारी पायदेवो नर्मिगवंत पुरुष धरिलवामट ...

तो डवढात्य जगन्नाथी अरेभिल ... धव।

केका - अन्याय केला जरी बाळ कोनें
क्षमा करावी जगपाळ कानें
तूं माय बाप स्थिर जंगमाचा
अन्याय हासोशि भुजंगमाचा

मूलमूर्ति -

चौ। मूलमूर्ति अजिया भुजगा, शांति मार्ग चतुर्दिजगा। चौ॥ ... अपरा ध ... सुखाय ...

पद तुमको सरन सरन महाराज। हम गरीब तुम गरीबन के भक्तवत्सल महाराज। तुम सरन ॥१॥

मांगत हैं हम पति-प्रानकी। भिक्षा देवो आज ॥२॥

मान पुरो प्रभु कहत कामीनी। राखो हमारी लाज ॥३॥

आर्या - नमितां प्रसन्न होय स्तविता को प्रभु ... जीवाला।
अलि ... रमग ... दीपाला ... कुटुंब जावाला।

केका - कड्यावरुनिया उड्या प्रथम घालुनि त्यागड्यो
गजे परशुपेटती ... भुजा अगड्या।
... तनु फाटती मनमटी कडी दाटती १५
सुखे अमित वाटती विरह सिंधुते आटती

ओंवि नैदेव साऽमृत जला यमुना निर्विबाभवन

नैदेवसामृतजला यमुना निर्विबाभवन

~~अभंग~~ – ~~मग धांवताती~~

कुका कुड्यावरुनियां उड्या प्रथमधावुनी त्याग ड्या

गडीपरुप भेटती तरतटी भुजी अंगड्या

~~ओंवि~~ – कुमेनितनु फुटतीमनगटीं कुडीं दाटती

सुरव ओमित वाटती विरहसिंदुन आटती

अभंग– गड्डी धांवताती। कांबकयाने हरिपुशिती

यशोदा राहिली पोटी धरिली च्युकु पाणी

गाई धावताती। कुळा आंगाते चाटिती

नवणिवे आनंद। नामयाची बुद्धी मंद

॥ श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर माउलीसमर्थ ॥

श्रीमज्ज्ञानेश्वरं नत्वा सद्गुरुं करुणार्णवम् ॥
बालानां सुखबोधाय मधुरं किंचिदुच्यते ॥१॥

॥ श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर माउलीसमर्थ ॥

आपल्या निर्गुण रूपानी अखिल ब्रम्हाण्डात व्याप्त असून साधूंचे रक्षण दुष्टांचा निग्रह व भक्तांच्या प्रेमाकरिता सगुण रूपानी अवतीर्ण होणाऱ्या भगवान परमात्मा वासुदेवाला नमस्कार असो.

प्र० – वरील मंगलावरून परमात्म्याचे दोन रूपे आहेत असे दिसते.

उ० – होय. द्वावेव ब्रम्हणो रूपे सगुणो निर्गुणश्च या श्रुति प्रमाणें परमात्म्याचे सगुण निर्गुण अशी दोन रूपे आहेत. तुकाराम माहाराजानी ही आपल्या अभंगात "सगुण निर्गुण दोनी ज्याची अंगे" अशा प्रकार म्हटले आहे.

प्र० – परमात्म्याचे या दोन रूपाचे काय प्रयोजन आहे?

उ० – (निर्गुण रूपाचेच ज्ञान होत असल्यामुळे) ज्ञान ~~प्राप्ति~~ हे निर्गुण रूपाचे प्रयोजन आहे. व (भक्ति सगुण रूपाचीच होत असल्यामुळे) भक्ति ~~प्राप्ति~~ हे सगुण रूपाचे प्रयोजन आहे.

प्र०- हे निर्गुणरूपाचे ज्ञान कशानी होते?
उ०- वेदान्त वाक्यांच्या श्रवण, मनन, -
निदिध्यासानी.
प्र०- या वेदान्त वाक्यांच्या श्रवणादिकास
अधिकाऱ्याची आवश्यकता आहे काय?
उ०- होय. याकिंवा पूर्वजन्मांतरी यथाशास्त्र
वेद वेदाङ्गादिकांचे अध्ययन करून त्यात
सांगितलेल्या काम्य व निषिद्ध कर्म त्याग
पूर्वक निष्काम नित्य नैमित्तिक प्रायश्चित्त
कर्म व (उपासना) यांच्या अनुष्ठानानी
सर्व पापा पासून मुक्त होऊन शुद्ध अंतः -
करण झालेला व साधन चतुष्टय संपन्न
जीवात्मा अधिकारी आहे.
प्र०- वेद वेदाङ्गादिक कशास म्हणतात व ते
कोणचे आहेत?
उ०- ऋषी लोकानी समाधीत ऐकलेली पर -
मात्म्याची जी निश्वासरूप वाणी तिला
वेद म्हणतात. ही ऐकू येते म्हणून इला -

श्रुति नांव आहे. हे वेद ऋग्वेद, यजुर्वेद,
सामवेद व अथर्व वेद या भेदानी चार प्र-
कारचे आहेत व यांचे ऋग्वेदाचा आयु-
र्वेद, यजुर्वेदाचा धनुर्वेद, सामवेदाचा
गांधर्ववेद व अथर्ववेदाचा स्थापत्य -
वेद या प्रमाणें चार उपवेद आहेत.
वेदाङ्ग - शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त,
छन्द व ज्योतिष ही ६ वेदाङ्गे
होत.
शास्त्र - न्याय, वैशेषिक, सांख्य, योग,
पूर्व मिमांसा व उत्तर मिमांसा ही
६ शास्त्रे होत. यांनाच उपाङ्ग ही म्हणतात.
स्मृति - समाधींत श्रवण केलेल्या श्रुतीच्या अर्थाचे स्मरण करून
आपल्या शब्दांत प्रतिपादन करणें यास स्मृति म्हणतात.
इतिहास - भारत व रामायण याना इति -
-हास म्हणतात. (मनु, याज्ञवल्क्य, व्यास इत्यादि आप्तानी केलेल्या पुस्तकांस)
पुराण - ब्रम्ह, पद्म, विष्णु, शिव, भागवत,
नारद, मार्कण्डेय, अग्नि, भविष्य, -

- ब्रम्हवैवर्त, लिङ्ग, वाराह, स्कंध,
वामन, कूर्म, मत्स्य, गरुड व ब्रम्हाण्ड
अशी ही १८ पुराणें आहेत.

इतिहास पुराणें मिळून पांचवा वेद म्हणता-
त.

वेदात कर्म, उपासना व ज्ञान अशी तीन
कांडे आहेत. कर्मानी चित्त शुद्धि-
होत असून उपासनेनी चित्ताची एका-
ग्रता होते व ज्ञानानी मोक्ष मिळतो.

प्र०- कर्म कशास म्हणतात व त्याचे किती
प्रकार आहेत?

उ०- ब्राम्हणत्वादिक अभिमानानी केले जाते जे
त्याला कर्म म्हणतात. हे नित्य,
नैमित्तिक, काम्य, निष्काम, प्राय-
श्चित्त व निशिद्ध अशा भेदानी ६ -
प्रकारचे आहे.

श्रुति, स्मृति, पुराणादिकानी आपल्या

वर्णाश्रमा प्रमाणें प्रति दिवशी करण्या-
स सांगितलेले जे ते नित्य कर्म होत
हे केल्यानी पुण्य होत नसून न केल्या-
नी दोष होतो (पाप लागते) जसे संध्या
वंदनादिक.

वेदादिकानीच विशिष्ट देश काली -
देवतादिक व पितरादिक यांच्या निमित्ता-
नी सांगितलेले जे ते नैमित्तिक कर्म होय. जसे
श्राद्ध व्रतादिक.

पुत्रादिक व स्वर्गादिक फलाच्या इच्छेने -
केले जाते जे ते काम्य कर्म होय जसे
पुत्रकामेष्टि यज्ञ व हरिवंश श्रवणादिक.

नित्य नैमित्तिक कर्म ही फलाचे इच्छेनी
केली असता काम्य होतात व इच्छा
सोडून केली असता निष्काम होतात.

फलाची इच्छा सोडून केले जाते तेच
निष्काम कर्म होय.

वेदादिकानी न करण्यास सांगितलेले

जे ते निषिद्ध कर्म होय. जसे मद्यपान, परस्त्रीगमनादिक.

निषिद्ध कर्म घडल्याने उत्पन्न झाले-ल्या पापाची निवृत्ति करण्या करिता-सांगितलेले जे ते प्रायश्चित्त कर्म होय. जसे कृच्छ्र-चान्द्रायण व्रतादिक.

निषिद्ध कर्म त्याग पूर्वक निष्काम-कर्मांनी चित्तशुद्धि होते.

चित्ताचे तीन दोष आहेत. मल, विक्षेप आणि आवरण. पाप करणें किंवा पापाकडे प्रवृत्ति असणें याला मल दोष म्हणतात. हा निष्काम कर्मा-च्या पुण्यानी नाश होतो.

मलदोष निवृत्त झाल्यावर जपतप व्रतादिक इत्यादिक सद्वासनेच्या योगानी चित्त चंचल होण्यास विक्षेप-दोष म्हणतात. हा उपासनेनी नाश पावतो.

ब्रम्हस्वरूपाच्या अज्ञानास आवरण-दोष म्हणतात.

प्र०- स्त्रियांना कोणच्या कर्मांचे ठिकाणी अधिकार आहे?

उ०- स्त्रियांना पतीच्या आज्ञेनी काही व्रतादि-कांचे ठिकाणी अधिकार आहे. स्त्रियांचे मुख्य कर्म तर पतीची सेवा कर-णें हेच होय. स्त्रिया ह्या पतीची सेवा-करून त्याना अनुकूल राहिल्या म्हणजेच त्यांना पतीच्या अर्ध्या पुण्याची प्राप्ती होते. स्त्रियांना उपासना ही विशेषेकरून पतीचे ठिकाणी विष्णुबुद्धि ठेऊन सांगि-तली आहे. विधवा स्त्रियांना उपवा-स व्रतादिकांचे ठिकाणी स्वतंत्र रीतिने अधिकार असून भगवंताची उपासना ही सांगितली आहे.

प्र०- उपासना कशास म्हणतात?

उ०- (परमेश्वरसंबंधी) ध्यानादिक मानसिक कर्म याला उपासना म्हणतात. ती सगुण निर्गुण या भेदानी दोन प्रकारची आहे.

प्र०- ज्ञान कशाला म्हणतात?

उ०- वस्तुचें यथार्थ (सत्य) स्वरुप कळण्यास ज्ञान म्हणतात. ज्ञान हें श्रवणादिकानी होत असून त्याकरिता वर सांगितल्या प्रमाणें - साधन चतुष्टय सम्पन्न अधिकाऱ्याची आवश्यकता आहे हें वर सांगितलें च आहे.

प्र०- चार साधनें कोणची आहेत?

उ०- १. (आत्मानात्म) विवेक, २ वैराग्य, ३ शमादि साधन सम्पत्ती आणि ४ मुमुक्षा ही चार साधनें होत.

१. आत्मा सत्य असून अनात्मा (म्हणजे इतर सर्व दृश्य प्रपंच) मिथ्या आहे असें समजणें यास आत्मानात्म विवेक म्हणतात.

२. यालोकातील स्त्री पुत्र धनादिक व स्वर्गातील रम्भाभोगादिक फलाची इच्छा

न करणें याला वैराग्य म्हणतात.

३. शम, दम, उपरम, तितीक्षा, श्रद्धा व समाधान ह्या शमादि ६ साधन सम्पत्ति होत. मनाचा रोध करणें यास <u>शम</u> म्हणतात. नेत्रादिक बाह्येंद्रियांचा त्याच्या विषया पासून रोध करण्यास <u>दम</u> म्हणतात. विषया पासून रोधलेली इंद्रियें पुन्हा विषयाकडे न जाऊं देणें किंवा वर्णाश्रमाणी प्राप्त झालेल्या कर्माचा विधीनें त्याग करणें यास <u>उपरम</u> म्हणतात. शीतोष्ण सुख दुःखादि द्वंद्व सहन करण्याची शक्ति असणें हिला <u>तितीक्षा</u> म्हणतात. गुरु आणि वेदान्तवाक्याच्या विश्वासास <u>श्रद्धा</u> म्हणतात. गुरु वेदान्तानी सांगितलेल्या विषयांचें (श्रवणाचे) ठिकाणी चित्ताची एकाग्रता असणें यास <u>समाधान</u> म्हणतात.

४ जन्ममरणादिक संसारबंधनातून सुटण्याची जी
इच्छा तिला मुमुक्षा म्हणतात.

प्र० - आत्मा कशाला म्हणतात?

उ० - स्थूल, सूक्ष्म, कारण या तीन शरीराहून भिन्न
पंचकोशाच्या पलीकडे असणारा व जाग्रत्ति
स्वप्न, सुषुप्ति या तीन अवस्थेचा साक्षी सच्चिदा-
-नंद स्वरूप जो त्यास आत्मा म्हणतात.

स्थूलशरीर - *पंचीकृत म्हणजे प्रमाणानी मिसळ-
-लेल्या अशा पांच माहाभूता पासून बनलेले,
कर्मा पासून उत्पन्न झालेले, असणें, उत्पन्न होणें,
वाढणें, परिणाम पावणें, क्षीण होणें व नाश-
पावणें या ६ विकारानी युक्त व सुख दुःखादि
भोगाचे स्थान असे जे त्याला स्थूल शरीर
म्हणतात.

* आकाश वायु तेज आप (पाणी) पृथ्वी ही - (१२ पृष्ठावर पाहा)

सूक्ष्म शरीर - अपंचीकृत म्हणजे न मिसळलेल्या
अशा पांच माहाभूता पासून बनलेले असून
कर्माच्या योगानें उत्पन्न झालेले, कर्ण, त्वचा,
नेत्र, जिव्हा व नासिका अशी पांच ज्ञानेंद्रि-
-यें; वाणी, हस्त, पाद* गुद व जननेंद्रियें,
अशी पांच कर्मेन्द्रियें; प्राण, अपान, व्यान,
उदान व समान असे पंचप्राण मन व बुद्धि
अशा 17 तत्वानी युक्त व सुख दुःख भोगाचे
साधन असे जे त्यास सूक्ष्म शरीर म्हणतात.

कर्णाचा विषय शब्द ग्रहण, त्वचेचा विषय
स्पर्श ग्रहण, डोळ्याचा विषय रूप ग्रहण, जि-
-व्हेचा विषय रस ग्रहण व नासिकेचा विषय
गंधग्रहण हे होत.

कानाची देवता दिशा, त्वचेची वायु, डोळ्या-
ची

डोळ्याची सूर्य, जिव्हेचा वरुण, नासिकेची दोघे अश्विनी कुमार.

वाणीचा विषय भाषण, हस्ताचा विषय वस्तुग्रहण, पादाचा विषय गमन, गुदाचा विषय मलत्याग, व उपस्थाचा विषय ~~मलत्याग~~ आनन्द हे होत.

वाणीची देवता अग्नि, हस्ताची इन्द्र, पायाची विष्णु, गुदाची मृत्यु व उपस्थाची प्रजापती, हृदय, गुद, सर्व शरीर, कंठ व नाभी या पांच स्थान भेदानी एकाच वायुचे प्राण, अपान, व्यान उदान व समान अशी पांच नावें आहेत.

संकल्प विकल्प करणें यास मन म्हणत असुन निश्चय करण्यास बुद्धि म्हणतात. यांचेच चिन्तन करणें

म्हणजे चित्त व अहंता धारण करणें म्हणजे अहंकार असे पुन्हा दोन भेद आहेत. या दोन भेदाचा कोणी मन बुद्धित अंतर्भाव करतात.

मनाची देवता चन्द्रमा, बुद्धिची देवता ब्रम्हा, अहंकाराची देवता रुद्र व चित्ताची देवता वासुदेव.

कारणशरीर — सत्य किंवा असत्य रुपानी बोलून दाखविण्यास अशक्य, अनादि, अविद्यारुप, स्थूलसूक्ष्म या दोन शरीराचे कारण, स्वस्वरुपाचे अज्ञान, व कल्पनारहित असे जे त्यास
(पडछ्यांत असलेली शक्ति प्रत्यक्ष आढळायेत नाही परंतु कार्य [illegible] अनुभव येतो.)
कारणशरीर म्हणतात.
[illegible] कारण माया ही शक्ति असून जड असल्यामुळे तीस स्वतंत्र जगाचे कारण होण्याची शक्ति नाही [illegible] निराकार ही [illegible] येत नाही [illegible]

(१० पृष्ठावरची पुढील) — पृथ्वी ही पंच महाभूतें होत.

ब्रम्हाच्या आश्रयाने असलेली सत्व रज तम या तीन गुणात्मक जो माया तिच्या पासून पूर्वी आकाश

उत्पन्न झाले. आकाशापासून वायु, वायुपासून
तेज, तेजापासून आप, आपापासून पृथ्वी.
आकाशाचा गुण शब्द, वायुचा स्पर्श, तेजाचा
रूप पाण्याचा रस व पृथ्वीचा गंध. माया ही त्रि-
गुणात्मक असल्यामुळे व कारणाचे गुण कार्यात
उतरतात (येतात) हा नियम असल्यामुळे आ-
-काशादिक पांच भूतेंही त्रिगुणात्मक आहेत. त्या-
-च प्रमाणे आकाश वायुचे कारण असल्यामुळे
आकाशाचा शब्द गुण वायु मध्ये येऊन वायु
मध्ये शब्द व स्पर्श असे दोन गुण आहेत. त्याच
न्यायाने तेजा मध्ये शब्द स्पर्श व रूप हे तीन
गुण असून पाण्या मध्ये शब्द स्पर्श रूप रस हे चार
गुण आहेत व पृथ्वी मध्ये शब्द स्पर्श रूप रस
गंध हे पांच गुण आहेत.
(कोणी आधुनिक मतवादी वायु तेज पाणी व पृथ्वी
अशी चारच भूतें मानतात. आकाश मानित ना-
हीत. व आकाशाचा शब्द गुण हा वायुचाच गुण
आहे असे मानतात. परन्तु हे असंगत आहे.
कारण ज्या भूतापासून जे इंद्रिय उत्पन्न होते
ते त्या भूताच्या गुणाला ग्रहण करते हा नियम
असल्यामुळे वायुपासून उत्पन्न झालेले
जे स्पर्श इंद्रिय त्यानी नवीन मतवाद्यानी
मानलेल्या वायुच्या शब्द व स्पर्श अशा दोन

गुणाला ग्रहण केले पाहिजे परन्तु असा अनुभव
येत नाही. तर प्रत्येक इंद्रिय एक एक गुणाला
ग्रहण करिते व ती इंद्रिय पांच असल्यामुळे
भूतें ही पांचच सिद्ध होतात).

वर सांगितलेली ही त्रिगुणात्मक पांच भूतें सूक्ष्म
आहेत. यांनाच कोणी तन्मात्राही म्हणतात. या आ-
काशादिक सूक्ष्म पंच महाभूताच्या सत्वांशापासू-
-न क्रमाने श्रोत्र, त्वक्, चक्षु, जिव्हा व घ्राण ही
पंच ज्ञानेन्द्रियें उत्पन्न झाली व या पांची भूतांचे
सत्वांश मिळून अन्तःकरण उत्पन्न झाले. सत्व हे
ज्ञान उत्पन्न करणारे असून ही इन्द्रिये व मन ही
विषय ज्ञानाला कारणीभूत होत असल्यामुळे
सत्व अंशाचीच कार्ये आहेत. व ही ज्ञानेन्द्रिये ए-
-काएकाच्याच गुणाला ग्रहण करित असल्यामुळे
एक एकांच्या सत्वांशापासून च उत्पन्न झाली.

मन हे पांची भूतांच्या गुणाला ग्रहण करण्याला
कारणीभूत असल्यामुळे पांची भूतांच्या सत्वांशा
पासून उत्पन्न झाले.

या पांची भूतांच्या एक एका रजांशापासून पंच
कर्मेन्द्रियें उत्पन्न झाली. कारण यांच्या मध्ये रजा-
चे कार्य कर्मच दिसते. या पाचीचे रजांश मि-
ळून प्राण उत्पन्न झाला. कारण हा पाची कर्म-
न्द्रियांच्या व्यवहाराला कारणीभूत आहे.

आता राहिलेले या पांच महाभूतांचे जे तमांश
त्यांचे पंचीकरण होऊन स्थूलभूत उत्पन्न झाले.
हे पंचीकरण येणें प्रमाणें:- प्रत्येक भूतांचे दोन
तुकडे करून त्यातील एका तुकड्याचे चार भाग
करावे म्हणजे हा एकेक भाग एक अष्टमांश होतो.
हा एकेक स्वतःच्या पूर्वीच्या अर्धभाग सोडून इतर
चार भूतांच्या अर्धा मध्ये मिळवावे. याच म्हणजे

प्रत्येक भूताचा स्वतःचा एक अर्धा व इतर चार
भूतांचे चार अष्टमांश मिळून एक अर्धा, हे दोनी
अर्धा मिळून एक भूत तयार होतो.

प्र०- पांच कोश कोणचे आहेत?

उ०- अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय आ-
-नन्दमय हे पांच कोश होत.

अन्नरसानी उत्पन्न होऊन व अन्नरसानीच
वृद्धिस पावून अन्नरूप पृथ्वी मध्ये जो लीन होतो
त्यास अन्नमय कोश म्हणतात. हा अन्नमय को-
-शच स्थूल शरीर होये.

प्राणादिक पांच वायु व वाणि आदि पांच कर्मे-
न्द्रिये मिळून प्राणमय कोश होतो. क्षुधातृषा-
-दिक याचे धर्म आहेत. यालाच क्रियाशक्ति
म्हणतात. शरीरात जितकी म्हणून क्रिया-
होते-

होते ती सर्व या प्राणमय कोशानीच होते.

मन आणि पांच ज्ञानेन्द्रियें मिळून मनोमय कोश होतो. शोक मोहादिक याचेच धर्म असून यालाच इच्छा शक्तिही म्हणतात. जीजी म्हणून इच्छा होते ती सर्व या मनोमय कोशाच्या योगानीच होते.

बुद्धि व पंचज्ञानेन्द्रियें मिळून विज्ञानमयकोश होतो. कर्तृत्व, भोक्तृत्व, निश्चयादिक याचेच धर्म आहेत. यालाच ज्ञान शक्तिही म्हणतात. जेजे म्हणून विषयाचे ज्ञान होते ते या विज्ञान-मय कोशाच्या योगानीच होते.

प्राणमय, मनोमय, विज्ञानमय हे तीन कोश मिळून सूक्ष्म शरीर होते.

कारण शरीररूप अविद्येत असलेले मलिनसत्व-रूप (रज तमानी तिरस्कृत असे जे सत्व) असे-

अन्तःकरण. प्रिय, मोद, प्रमोद वृत्ति सहित याला आनन्दमय कोश म्हणतात.

इष्ट वस्तुच्या पाहण्या पासून जे सुख ते प्रिय तिच्याच प्राप्ती पासून जे सुख तो मोद व ति-च्याच भोगा पासून जे सुख त्याला प्रमोद म्हणतात.

प्र०- जागृत् स्वप्न व सुषुप्ति अवस्था कशास म्हणतात?

उ० ज्या अवस्थेत कानादि इंद्रियानी शब्दादि विषयांचे ज्ञान होते त्याला जागृत् अवस्था म्हणतात. या अवस्थेत स्थूल शरीरावर अभिमान असतो. स्थूल शरीराच्या अभि-मानी आत्म्यास विश्व हे नांव आहे.

जागृत अवस्थेत जे ऐकिले व पाहिले त्या पासून उत्पन्न झालेल्या वासनेच्या योगानी - निद्रे समयी जो प्रपंच भासतो तिला स्वप्नाव-स्था म्हणतात. स्वप्नावस्थेत ~~स्थूल~~ सूक्ष्म शरीर असून त्याच्या अभिमानी आत्म्यास तैजस हे नांव आहे.

मी काही जाणत नव्हतो व सुखानी निजलो होतो असा अज्ञान व सुखाच्या ज्या काळच्या अनुभव सांगतो त्या काळास सुषुप्ती अवस्था म्हणतात. या अवस्थेत कारण शरीर असते. त्याच्या अभिमानी आत्म्यास प्राज्ञ हे नांव आहे. या शरीरकोशादिकास आत्मा हा माझे शरीर, माझे प्राण, माझे मन, माझी बुद्धि, माझे विज्ञान या प्रमाणें स्वतः मदीयत्वाने जाणत असल्या मुळे मदीयत्वाने (माझेपणाने) जाणले जाणाऱ्या अलंकार ग्रहादिका प्रमाणें हे आत्म्याहून भिन्न आहेत अर्थात् आत्मा नव्हेत.

तर आत्मा हा सच्चिदानन्दस्वरूप आहे. तिन्ही काळी राहते जे त्याला सत् म्हणत असून ज्ञान स्वरूपाला चित् व सुखस्वरूपाला आनन्द म्हणतात. या प्रमाणें सच्चिदानन्दस्वरूप आत्म्याला जाणावे

याच्याच उलट असत् जड दुःखरुपास अनात्मा म्हणतात.

शरीरकोशादिक हे सर्व असत् जड दुःखरूप असल्यामुळे हे अनात्मा होत.

जी वस्तु आदि अन्ती नसून मध्येच दोरीच्या सर्पा प्रमाणें किंवा स्वप्ना प्रमाणें भासते ती खरोखर मध्ये नसून भ्रमानीच भासते. तिलाच असत् किंवा मिथ्या म्हणतात. या प्रमाणेंच हे स्थूल सूक्ष्म कारण तीन्ही देह (स्थूल देह हा स्वप्न निद्रेत भासत नसून सूक्ष्मदेह हा जागृत निद्रेत भासत नसून कारण देह हा जागृती स्वप्नात भासत नसून) मध्येच भासतात म्हणून हे मिथ्या होत.

जे वस्तु ज्ञानशून्य म्हणजे आपल्याला जाणत नसून दुसऱ्यालाही जाणत नाहीं तिला जड म्हणतात. प्रतिकूल वेदनास (अनुभवास) दुःख म्हणतात

प्र०- आत्मा व देहादिक हे जर विरुद्ध स्वभावाचे व विरुद्ध धर्मी आहेत तर यांचा संयो-

होऊन यांचे परस्परांचे धर्म परस्परांचे ठिकाणी कसे भासतात ?

उ०- वस्तुतः पाहिले असता यांचा संयोग होत नसून अज्ञानामुळे रज्जूसर्पवत् संयोग झाल्या सारखा भासतो. परन्तु तो संयोग सत्य नसून मिथ्या आहे व त्याचे धर्मही जे एकमेकांचे ठिकाणी भासतात ते भ्रमानी भासतात. यांच्याया संयोगासच अध्यास म्हणतात. याचे मूळ कारण सत्य स्वरूपाचे अज्ञान हे आहे.

प्र०- अज्ञानाचे काय स्वरूप आहे ?

उ०- अज्ञान हे अनादि सत् किंवा असत् रूपाने बोलून दाखविण्यास अशक्य (सत् म्हणावे तर ज्ञानानी नाशपावते व असत् म्हणावे तर प्रत्यक्ष भासते), त्रिगुणात्मक, ज्ञानविरोधी, भावरूप (अस्तित्वरूप) अशा प्रकारे मी अज्ञ आहे अशा प्रकारच्या

अनुभवावरुन सांगतात. "देवात्मशक्तिं स्वगुणैर्निगूढां" इत्यादि श्रुति वरुन या अज्ञाना पासून आत्मानात्म्याचा अविवेक होऊन अध्यास होतो.

अज्ञान हे व्यष्टि समष्टि रूपाने दोन प्रकारचे आहे. एकत्वाला व्यष्टि म्हणत असून समुदायाला समष्टी म्हणतात. जसे झाड व वन समष्टी अज्ञानास माया म्हणत असून ती शुद्ध सत्वात्मक (अल्प अशा रजतमानी विकार न पावलेल्या अधिक सत्वात्मक) आहे व व्यष्टी अज्ञानास अविद्या म्हणत असून ते मलिन सत्वात्मक (अधिक रजतमानी विकार पावलेल्या अल्प सत्वात्मक) आहे. समष्टी अज्ञानाच्या म्हणजे मायेच्या अभिमानी चैतन्यास ईश्वर (सर्वज्ञ, सर्वेश्वर, सर्वनियन्ता, अव्यक्त, अन्तर्यामी, जगत्कारण)

म्हणत असून व्यष्टी अज्ञानाच्या म्हणजे
अविद्येच्या अभिमानी चैतन्यास प्राज्ञ (-
अल्पज्ञ, अनीश्वर जीव इत्यादि) म्हणतात.
या समष्टी अज्ञानरूप मायेस व व्यष्टी अज्ञान-
रूप अविद्येस अनुक्रमें ईश्वराचे व जीवाचे
कारणशरीर म्हणतात. व्यष्टी सूक्ष्म व स्थूल -
शरीराच्या अभिमानी आत्म्यास तैजस व-
विश्व म्हणतात हे मागे सांगितलेच आहे.
समष्टी सूक्ष्म शरीराच्या अभिमानी आत्म्यास -
हिरण्यगर्भ म्हणत असून समष्टी स्थूल शरीरा-
च्या अभिमानी आत्म्यास वैश्वानर किंवा विरा-
-ट् म्हणतात.
या अज्ञानाच्या आवरण व विक्षेप अशा दोन
शक्ति आहेत - वस्तुस्वरूप झाकणाऱ्या शक्तिस-

आवरणशक्ति म्हणत असून तद्विपरीत देहादि
क संसार भासविणाऱ्या शक्तिस विक्षेपशक्ति
म्हणतात. हे आवरण ही असत्वापादक व
अभानापादक या भेदाने दोन प्रकारचे आहे.
ब्रम्ह नाहीं अशा प्रत्ययास असत्वापादक
आवरण म्हणत असून ब्रम्ह मी जाणत नाही
अशा प्रत्ययास अभानापादक आवरण म्हण-
तात.
विक्षेप हे मलयुक्त व अमलयुक्त या भेदाने दोन-
प्रकारचे आहे - आवरण निवृत्ति (नाहीशी होणें)
बरोबर ज्याची निवृत्ती होते त्याला मलयुक्त-
विक्षेप म्हणतात. जसे रज्जूवर भासलेला-
विक्षेपरूपी सर्प रज्जूस्वरूपाचे आवरण निवृत्त
झाल्यावर म्हणजे त्याचे ज्ञान झाल्यावर निवृत्त

होतो म्हणून त्याला मलयुक्त विक्षेप म्हणतात.

आवरण

आवरण निवृत्ति बरोबर ज्याची निवृत्ति होत नाहीं त्याला अमलयुक्त विक्षेप म्हणतात. जसे रज्जूसर्पापासून होणारे भयकंपादि विक्षेप रज्जूचे आवरण भंग होऊन ज्ञान झाल्यावरही सर्परूपी मलयुक्त विक्षेपाप्रमाणे निवृत्त होत नाहीं म्हणून त्याला अमलयुक्त विक्षेप म्हणतात.

अर्थात् अज्ञानाच्या या दोन शक्ति मुळे-च वस्तु स्वरूपाचे भान न होता त्यावर देहादिक व विश्वादिक हा प्रपंच भासतो. यालाच अध्यारोप म्हणतात. (सर्प नसलेल्या रज्जूचे ठिकाणी होणाऱ्या मिथ्या सर्पारोपा प्रमाणें विश्व नसलेल्या ब्रम्हाचे ठिकाणी

होणाऱ्या मिथ्या विश्वारोपासच अध्यारोप-म्हणतात). हा अध्यारोप अज्ञानशक्तिपासून होत असल्या मुळे याची निवृत्ति ज्ञानाने-च होणें शक्य आहे.

या प्रमाणें ज्ञानाने अध्यारोपाचा बाद होऊन सत्य स्वरूप कळण्यास अपवाद म्हणतात. ज्ञान हे श्रवण, मनन, निदिध्यासाच्या योगाने होते हे मागे सांगितलेच आहे.

श्रवण — ६ प्रकारच्या लिङ्गानी संशयरहित समस्त वेदान्ताचे अद्वयित वस्तुचे ठिकाणी तात्पर्य अवधारण्यास (ग्रहणकरण्यास) श्रवण म्हणतात.

उपक्रमोपसंहार, अभ्यास, अपूर्वताफल, अर्थवाद व उपपत्ती यानां ६ लिङ्ग म्हणतात.

प्रकरणामध्ये सांगितलेल्या अर्थास आरंभीच अन्ती सांगणें यांस उपक्रमोपसंहार म्हणतात.

प्रकरणात सांगितलेल्या वस्तुला मध्ये पुन्हा २ सांगणें याला अभ्यास म्हणतात.

प्रकरणात प्रतिपादित जी वस्तु ती दूसऱ्या प्रमाणाचा विषय न होणें (प्राप्त न होणें) याला अपूर्वता म्हणतात.

प्रकरणात प्रतिपादन केलेल्या साधनाचे त्यात सांगितलेले जे प्रयोजन त्याला फल म्हणतात.

प्रकरणात प्रतिपादित अर्थाची प्रशंसा करणें याला अर्थवाद म्हणतात.

प्रकरणात प्रतिपादिलेल्या अर्थाच्या सिद्धि करिता त्याठिकाणी सांगितलेल्या युक्तीस - उपपत्ती म्हणतात.

श्रवण केलेल्या अद्वैत वस्तुचे तिचे ठिकाणी उत्पन्न झालेल्या असंभावनेची श्रुतीला अनुरुप अशा तर्काने निवृत्ति करुन सतत चिंतन करण्यास मनन म्हणतात.

विपरीत भावना (म्हणजे विजातीय देहादि बुध्यन्त जड पदार्थांचे) निराकरण करुन अद्वितीय - वस्तुच्या सजातीय करणास (म्हणजे अद्वितीय वस्तुचे तैलधारावत अखंड चिन्तन करण्यास निदिध्यास म्हणतात.

वर श्रवण मनन निदिध्यास यामध्ये अनुक्रमाणे निवृत्ति करण्यास सांगितलेले संशय, असंभावना व विपरीत भावना हे ज्ञानाचे ठिकाणी तीन प्रतिबंध आहेत.

द्विकोटिक ज्ञानास किंवा पूर्वपक्ष व सिद्धान्त बीज-

- रूपप्रवाही जी चित्तवृत्ति तिला संशय म्हण-
तात. हा संशय प्रमाणगत व प्रमेयगत या
प्रमाणें दोन प्रकारच्या आहे.

ज्ञेय ज्याच्या योगानी जाणल्या जाते त्याला
प्रमाण म्हणत असून प्रमाणाच्या योगाने जे
जाणल्या जाते त्यास प्रमेय म्हणतात. व
प्रमाणाच्या योगानी जाणणारा जो तो प्रमाता
होय. (याचे प्रमाणें ध्येय ध्याता ध्यान, ज्ञेय
ज्ञाता ज्ञान इत्यादि त्रिपुटी ही जाणाव्या)
प्रमाण हे प्रत्यक्ष, अनुमान, उपमान, शब्द,
अर्थापत्ती आणि अनुपलब्धी या भेदानी
६ प्रकारचे आहे.

श्रोत्रादिक इंद्रियाने शब्दादिक विषयाचे-
ज्ञान होण्यास प्रत्यक्ष प्रमाण म्हण तात.
इंद्रियास गोचर नसल्या वस्तुचे प्रत्यक्ष-

प्रमाणाच्या बलावर बुद्धिच्या योगानी जे ज्ञान होणे
त्यास अनुमान प्रमाण म्हण तात.
वेदादिक शास्त्र व आप्त वचन यास शब्द प्रमाण
म्हणतात. यथार्थ बोलणारा त्याला आप्त म्हण-
तात.

प्रसिद्ध साधर्म्यावरून (सारखेपणा) साध्य साधनास उपमान
म्हणतात. जसे तळ्या वरून समुद्राची कल्पना-
करणें किंवा गाई वरून गवयाची (`[illegible]`) कल्पना करणें.

अर्थ नियमा वरून ज्याचे ग्रहण होते त्याला
अर्थापत्ती म्हणतात. जसे देवदत्त दिवसा
जेवत नाहीं परन्तु लट्ठ दिसतो त्यावरुन
रात्रि जेवत असला पाहिजे असे जाणणें.

अतिदूर, अतिसमीप, इंद्रियघात, मनश्चां-
चल्य, सूक्ष्मत्व, व्यवधान, अभिभव, समाना-
-भिहार आणि अभाव या ९ प्रतिबंधाच्या-

योगाने पदार्थांचे भान न होण्यास अनुप-
लब्धि प्रमाण म्हणतात.

ह्या प्रसंगानी ६ प्रकारच्या व्याख्या सांगित-
ल्या. परन्तु या ठिकाणी (प्रमाणगत व प्रमेय
गत संशयाची व्याख्या सांगण्या करिता)
श्रुति (म्हणजे शब्द) प्रमाणाशीच कार्य -
आहे.

जगताचे कारण ब्रम्ह आहे किंवा प्रकृति आहे
अशा प्रकारच्या चित्त वृत्तीस प्रमेयगत
संशय म्हणतात.

वेदादिक कर्मांचे प्रतिपादन करितात किंवा
सिद्ध ब्रम्हाचे प्रतिपादन करितात. अशा प्रकार
च्या चित्तवृत्तीला प्रमाणगत संशय म्हणतात.
या प्रमाणें असंभावना व विपरीत भावना ही
प्रमेयगत व प्रमाणगत या भेदानी दोन प्रकारच्या

आहेत :-

ब्रम्ह हे जगताहून विलक्षण (म्हणजे ब्रम्ह चेतन -
असून जगत हे जड) असल्यामुळे ते जगताचे कारण
असणें कसे संभवते (कारण कार्य व कारण या
मध्ये सादृश्य असते) अर्थात् संभवत नाहीं.
अशा प्रकारच्या चित्तवृत्तीला प्रमेयगत-
असंभावना म्हणतात.

ब्रम्ह हे सिद्धच असल्यामुळे प्रत्यक्षादिक प्रमा-
णें ते प्रत्यक्षादि इतर प्रमाणानीही ज्ञात होणें
शक्य आहे. तेव्हां श्रुतिच्या सिद्ध ब्रम्हाला
प्रतिपादन करणारी कशी होईल कारण इतर
प्रमाणाच्या विषय होणाऱ्या वस्तुला तिचे प्रति
-पादन करणें निष्फल आहे. अशा प्रकार-
च्या चित्तवृत्तीला प्रमाणगत असंभावना
म्हणतात.

पटतंतू घट मृत्तिका इत्यादि कार्यकारणा
मध्ये सादृष्य दिसत असते परन्तु जगत आणि
ब्रम्ह यांच्या मध्ये जड-चेतनादिक विलक्षण-
ता असल्या मुळे जगत्कार्यासी सदृष असल्या-
मुळे जड प्रधानच जगताचे कारण होय
अशा प्रकारच्या निश्चय याला प्रमेयगत
विपरीत भावना म्हणतात.

सिद्ध ब्रम्हाला श्रुतिचे प्रतिपादन करणें -
निष्फल होत असल्या मुळे श्रुति ब्रम्हपर
(ब्रम्हाला प्रतिपादन करणारी) नसून कर्म-
परच (कर्मालाच प्रतिपादन करणारी)
आहे अशा प्रकारच्या निश्चयाला प्रमाण
गत विपरीत भावना म्हणतात.

ज्या वेदान्त वाक्याचे श्रवण करावयाचे ती
वाक्यें दोन प्रकारची आहेत. अवान्तर वाक्य
आणि माहावाक्य. जी तत् किंवा त्वम पदा-
चा बोध करितात ती आवान्तर वाक्यें असून
जी तत्त्वं पदाच्या ऐक्याचा बोध करितात

(म्हणजे जीव ब्रम्हाच्या ऐक्याचा बोध करि-
तात) ते महावाक्य होत.

आवान्तर वाक्यानी परोक्ष ज्ञान होत असून
महावाक्याने अपरोक्ष ज्ञान होते.

ब्रम्ह आहे असे जाणण्याला परोक्ष ज्ञान
म्हणत असून मीच ब्रम्ह आहे याला अप-
रोक्ष ज्ञान म्हणतात. मागे सांगितलेले
असत्वापादक (ब्रम्ह नाहीं) आवरण हे परो-
क्ष ज्ञानाने नाश होते व अभानापादक (मी
ब्रम्ह जाणत नाहीं) आवरण हे अपरोक्ष-
ज्ञानानी नाश होते.

अशा प्रकारे अपरोक्ष ब्रम्हात्मैक्यज्ञान
झाले असता तीन प्रकारचे दुःखाची -
अत्यन्त निवृत्ति व परमानन्दप्राप्ती
होणें याला मोक्ष म्हणतात.

वर ज्या दुःखाची निवृत्ती सांगितली ती
आध्यात्मिक, आधिभौतिक, व आधि-
दैविक होत. आध्यात्मिक हे दुःख-

शारीर व मानस भेदानी दोन प्रकारचे आहे. ज्वरादिक हे शारीरिक दुःख असून, प्रियवस्तु वियोग, अप्रिय वस्तुचा संयोग इत्यादिक हे मानस दुःख होत.
व्याघ्रादिक पशुपासून होणाऱ्या दुःखाला आधिभौतिक म्हणतात. व ग्रहपीडा-अतिवृष्टि आदिक यांच्यापासून होणाऱ्या दुःखास आधिदैविक दुःख म्हणतात.
या तीन दुःखाच्या अत्यन्त विनाश याचे कारण अज्ञान याचा नाश झाल्या वाचून होत नाहीं. म्हणून ज्ञानानीच कारणासहित याची निवृत्ती होते.
औषधादिक, शास्त्रादिक व शांत्यादिक हे जे यांच्या निवृत्तिचे लौकिक उपाय आहेत यांच्या योगानी या दुःखाची एकान्त व अत्यन्त निवृत्ति होत नाहीं.
एकान्त म्हणजे अवश्य. वर सांगितलेल्या-औषधादिक उपायानी ज्वरादिकाची अवश्य

निवृत्ति होतेच असा नियम नाहीं म्हणून यानां अनैकान्तिक (अवश्य लागून न पडणारे) उपाय म्हणतात.
त्याचप्रमाणें यदा कदाचित् निवृत्ति झाली तरी अत्यन्त म्हणजे नित्यची निवृत्ति होते असा नियम नाहीं. कारण पुन्हा रोगादिक होण्याचा संभव राहतोच. म्हणून यानां अनत्यंत म्हणजे अनित्य उपाय म्हणतात.
येथील उपाया प्रमाणें स्वर्ग प्राप्त्यादिक पारलौकिक उपाय ही एकान्त व आत्यन्तिक निवृत्ती-ची व परंसुख प्राप्तीची साधने नव्हेत.
म्हणून त्या इहपर उपाया पासून व त्यांच्या-फलापासून इच्छा रहित होणें याला वैराग्य म्हणतात हे मागे सांगितलेच आहे.
वर सांगितलेली मुक्ति दोन प्रकारची आहे-जीवन्मुक्ति व विदेह मुक्ति.
देह असतानांच त्रिविध दुःखाची अत्यन्त

निवृत्ति व परमानन्द प्राप्ति असणे याला -
जीवन्मुक्ति म्हणतात. व देह पातानन्तर ती -
असणे याला विदेह मुक्ति म्हणतात.

+टीप जीवन्मुक्ति ही तत्वज्ञान मनोनाश व वासना -
क्षय या तीहींच्या एककालिन अभ्यासाने
प्राप्त होते.

नुसत्या तत्वज्ञानाने (मनोनाश व वासनाक्षया
वाचून) विदेह मुक्ति तर अवश्य होते परन्तु
जीवन्मुक्ति प्रमाणे दृष्ट दुःख निवृत्ति व दृष्ट परमानन्द -
प्राप्ति मात्र होत नाहीं.

याकरिता तत्वज्ञानानन्तरही जीवन्मुक्ति सुखार्थ
विरक्ति आणि उपरति यांचा अभ्यास करावा असे
विद्यारण्य स्वामींनीं आपल्या जीवन्मुक्ति विवेक
वगैरे ग्रंथात सांगितले आहे

तत्वज्ञानाने अविद्यानिवृत्ति झाली असतांच
जरी वासना क्षय होतो तरी त्याचे रक्षण मात्र

विरक्ति आणि उपरति यांच्या वाचून होत नाहीं
म्हणून विरक्ति आणि उपरति यांच्या अभ्यासात क्लेश असून भक्तिने यांची सहज प्राप्ती
होते असे भक्ति शास्त्रात सांगितेले आहे.

दृढ तत्वज्ञान झाले असता चालता बोलता
निरंतर समाधीच असते. समाधीतच ~~किंवा~~
आत्मा किंवा आत्मज्ञान असून व्युत्थानीताहीं
असे थोडेच आहे, समाधि व व्युत्थान हे कुठे [illegible] असे ही ~~[illegible]~~ तत्वज्ञानी
यांचे मत आहे.

तत्वज्ञान झाल्या नन्तर संचित कर्मांचा नाश
होऊन क्रियमाण कर्माचा ही लेप लागत नाहीं
परन्तु प्रारब्ध कर्म मात्र भोगल्यावाचून क्षीण
होत नसल्यामुळे त्याचा भोग होई पर्यन्त
देह असतो. ज्या प्रमाणें सुटलेला बाण किंवा
कुलाल चक्रादि (लक्ष्यवेध किंवा घटादि कार्य

-तयार झाल्या नन्तरही) गति असे पर्यन्त गतिमान असतात.

संचित कर्म - पूर्वी अनंत जन्मी केलेले जे बीजभूत कर्म ते संचित कर्म होय.

वर्तमान देह उत्पन्न करून त्या ~~जन्मा~~तच सुख-दुःख देणार म्हणजे फलोन्मुख झालेले जे कर्म ते प्रारब्ध कर्म होय.

वर्तमान देहीं घडणार जे कर्म ते क्रियमाण कर्म होय.

या प्रमाणें कर्म हे संचित, प्रारब्ध व क्रियमाण या भेदानी तीन प्रकारचे आहेत.

~~ब्रह्माच्या जगत्कारणत्वाचे विचार -~~

कोण्याही कार्याला दोन प्रकारची कारणें असतात. एक निमित्त कारण व दुसरे उपादान कारण.

कार्याला ज्याची आवश्यकता असून जे कार्यानुगत म्हणजे कार्या मध्ये भरलेले असते ते उपादान कारण होय. जसे घटाला मृत्तिका,

पटाला तंतू इत्यादि.

कार्याला ज्याची आवश्यकता असून जे कार्या मध्ये भरलेले नसते ते निमित्त कारण होय. जसे घटाला कुंभार, दंड-चक्रादि.

उपादान कारण हे आरंभक, परिणामी व विवर्त या भेदानी तीन प्रकारचे आहे.

कार्य ज्यामध्ये समवाय संबंधाने (कार्यकारणाचा जो नित्य संबंध तो समवाय संबंध होय) राहून जे स्वसंयोगारंभाने कार्य उत्पन्न करते किंवा कार्यरूप होते ते आरंभ उपादान कारण होय. जसे पटाला तंतू.

जे स्वतः परिणाम पावून कार्य रूप होते ते परिणामी उपादान होय. (हे अर्धे विकृत व सर्व विकृत याभेदानी दोन प्रकारचे आहे. जे कार्य रूप झाल्यावर पुन्हा कारण रूप होते ते अर्धे विकृत होय, जसे कुंडलाकृति झालेला सर्प किंवा गार रूप झालेले पाणी.

जे कार्य रूप होऊन पुन्हां कारण रूप होत नाहीं-

ते सर्व विकृत होय. जसे दहीरूप झालेले दूध)
स्वरूपात विकार न पावून जे दुसऱ्या रूपानी भांसते ते विवर्त उपादान कारण होय. जसे सर्पाला रज्जू ; अलङ्काराला सुवर्ण.

विवर्त हा अध्यस्त, अनध्यस्त या प्रमाणें दोन प्रकारचा आहे.

वस्तु स्वरूपाला झाकून जो दुसऱ्या रूपानी भासतो तो अध्यस्त विवर्त असून वस्तु स्वरूपाला न झाकता जो दुसऱ्या रूपानी भासतो तो अनध्यस्त विवर्त होय. जसे रज्जूसर्प, सुवर्णालंकार.

ब्रम्ह हे जगताला विवर्तोपादान कारण असून माया ही परिणामोपादान कारण आहे. जगताचे निमित्त कारण ही ब्रम्हच आहे. ज्या प्रमाणें कातनी ही जाळ्याचे निमित्त व उपादान दोन्ही कारण रूप आहे.

(कातणी देह दृष्टिने जाळ्याचे उपादान कारण असून चैतन्यसहित बुद्धि दृष्टीने निमित्त कारण आहे. त्याप्रमाणे जगताला जड भूतांच्या दृष्टिने ब्रम्ह उपादान कारण असून साक्षीच्या ईश्वर दृष्टिने निमित्त कारण आहे.)

जगत हे ब्रम्हाचा अध्यस्त विवर्त असून अवतार स्वरूप हे जगताचा अनध्यस्त विवर्त होय.

निदिध्यासना करिता आवश्यक असलेल्या – योगाची यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान, आणि समाधि अशी आठ अंगे आहेत.

अहिंसा, सत्य, अस्तेय (चोरी न करणें) ब्रम्हचर्य व अपरिग्रह (अत्यन्त आवश्यकता नसलेल्या व शास्त्र निषिद्ध वस्तूचा संग्रह न करणें) हे यम होत.

शौच, संतोष, तप स्वाध्याय (वर्णाश्रमा प्रमाणें प्राप्त असलेले अध्ययन), प्रवचन (अध्यापन) हे नियम होत.

सिद्धासन पद्मासनादिक हे आसने होत. पूरक (वायु आंत ओढणें) कुंभक (वायु निरोध करणें) रेचक (हळुर वायु बाहेर सोडणें) करून प्राण निग्रहाचा अभ्यास करणें याला प्राणायाम म्हणतात

इंद्रियांना त्यांच्या विषयापासून निवृत्त

करणें याला प्रत्याहार म्हणतात.
इष्ट वस्तुचे ठिकाणीं चित्त धारण करण्यास (ठेवण्यास) धारणा म्हणत असून तिचे ठिकाणी चित्तांच्या प्रवाह करण्यास (म्हणजे सारखे चित्त ठेवण्यास) ध्यान म्हणतात.
ध्येयरूप होऊन जाण्याला समाधि म्हणतात.
ब्रम्ह हे तटस्थ लक्षण व स्वरूपलक्षण या भेदानी दोन प्रकारचे आहे. जगज्जन्मादिमत्व (जगाच्या उत्पत्ति स्थिति लयाला कारणी भूत जे ते) तटस्थ लक्षण असून सच्चिदानन्द हे स्वरूप लक्षण होय.
तटस्थ लक्षण युक्त जे ब्रम्ह ते शबलब्रम्ह असून स्वरूप लक्षण युक्त जे ब्रम्ह ते शुद्ध ब्रम्ह होय
शब्दाची अर्थाचे ठिकाणी जी प्रवृत्ति ती वृत्ति होय. ही (शब्द) वृत्ति तीन प्रकारची आहे - १ मुख्या (किंवा शक्ति) २ लक्षणा ३ गौणी —

मुख्या किंवा शक्ति वृत्ति - (अमुक शब्दापासून अमुक अर्थ जाणावा अशा) ईश्वरेच्छेपासून उत्पन्न होणारा जो अर्थ संकेत (किंवा शब्दाची अर्थाचे ठिकाणी प्रवृत्ति) ही शक्ति वृत्ति होय. जसे डित्थ म्हणजे तोडलेल्या लाकडाचे खोड; गाय म्हणजे चारपाय असून गळ्यात पोळी राहते ती; शुक्ल म्हणजे पांढरा रंग, पंकज म्हणजे कमल इत्यादि. या मुख्या वृत्तिने ज्या अर्थाच्या बोध होतो तो मुख्यार्थ (शक्यार्थ) किंवा वाच्यार्थ होय. (म्हणजे शब्द उच्चारल्या बरोबर जो अर्थ लक्षात येतो तो).
लक्षणा वृत्ति - मुख्यार्थ किंवा शक्यार्थ युक्त नसता तत्संबंधी अर्थाचे ठिकाणी जी शब्द प्रवृत्ति ती —— लक्षणा वृत्ति होय. जसे गंगेवर घर आहे " या वाक्यात गंगा — शब्दाचा शक्यार्थ जो प्रवाह त्यावर घर राहू शकत नाहीं म्हणून तत्संबंधी जो तीर त्यावर लक्षणा केली म्हणजे गंगेच्या तीरावर घर आहे असा अर्थ केला. या —

(८५)

या लक्षणा वृत्तीने जो अर्थ ज्ञात होतो तो -
लक्ष्यार्थ होये. लक्षणा जहत, अजहत
(किंवा भागत्याग)
व जहदजहत् अशा भेदाने तीन प्रकारची
आहे. जीत वाच्यार्थाचा त्याग असतो ती
जहत लक्षणा. गंगेवर घर आहे यात गंगेच्या
प्रवाहाचा त्याग करुन तीरावर लक्षणा केली.
जीत वाच्यार्थाचा त्याग नसून लक्ष्यार्थ अधिक
सेय
जोडला जातो ती अजहत् - जसे छत्रीवाले
जातात यांत बिन छत्रीचेही लोक असतात.
जीत वाच्यार्थाच्या एक देशाचा त्याग असतो
किंवा भागत्याग
ती जहदजहत् होय - जसे तो हा देवदत्त या
वाक्यात तो म्हणजे त्या देशकाली असलेला
देवदत्त व हा म्हणजे या देशकाली असलेला
देवदत्त. यात तो देशकाल व हा देशकाल
सोडला म्हणजे देवदत्त व्यक्ति एकच राहते.
५
<u>गौणीवृत्ति</u> - वाच्यार्थाच्या ठिकाणी अस-
लेल्या गुणानी युक्त जो त्याच्या सारखा दुसरा
पदार्थ त्याचे ठिकाणी त्या गुणामुळे जी-

(८७)

शब्द प्रवृत्ति ती गौणी वृत्ति होय. जसे
देवदत्त सिंह आहे या वाक्यात सिंहाच्या
शौर्यादि गुणानी युक्त जो देवदत्त त्याचे
ठिकाणी सिंह शब्दाची प्रवृत्ति. -
गौण वृत्तीने जो अर्थ जाणला जातो तो
गौणार्थ होय.

[OrderDescription]
,CREATED=20.08.19 15:13
,TRANSFERRED=2019/08/20 at 15:44:33
,PAGES=119
,TYPE=STD
,NAME=S0001514
,Book Name=M-641-SHRI GYANESHWAR MAULI SAMARTH
,ORDER_TEXT=
,[PAGELIST]
,FILE1=00000001.TIF
,FILE2=00000002.TIF
,FILE3=00000003.TIF
,FILE4=00000004.TIF
,FILE5=00000005.TIF
,FILE6=00000006.TIF
,FILE7=00000007.TIF
,FILE8=00000008.TIF
,FILE9=00000009.TIF
,FILE10=00000010.TIF
,FILE11=00000011.TIF
,FILE12=00000012.TIF
,FILE13=00000013.TIF
,FILE14=00000014.TIF
,FILE15=00000015.TIF
,FILE16=00000016.TIF
,FILE17=00000017.TIF
,FILE18=00000018.TIF
,FILE19=00000019.TIF
,FILE20=00000020.TIF
,FILE21=00000021.TIF
,FILE22=00000022.TIF

FILE23=00000023.TIF
,FILE24=00000024.TIF
,FILE25=00000025.TIF
,FILE26=00000026.TIF
,FILE27=00000027.TIF
,FILE28=00000028.TIF
,FILE29=00000029.TIF
,FILE30=00000030.TIF
,FILE31=00000031.TIF
,FILE32=00000032.TIF
,FILE33=00000033.TIF
,FILE34=00000034.TIF
,FILE35=00000035.TIF
,FILE36=00000036.TIF
,FILE37=00000037.TIF
,FILE38=00000038.TIF
,FILE39=00000039.TIF
,FILE40=00000040.TIF
,FILE41=00000041.TIF
,FILE42=00000042.TIF
,FILE43=00000043.TIF
,FILE44=00000044.TIF
,FILE45=00000045.TIF
,FILE46=00000046.TIF
,FILE47=00000047.TIF
,FILE48=00000048.TIF
,FILE49=00000049.TIF
,FILE50=00000050.TIF
,FILE51=00000051.TIF
,FILE52=00000052.TIF
,FILE53=00000053.TIF

FILE54=00000054.TIF
,FILE55=00000055.TIF
,FILE56=00000056.TIF
,FILE57=00000057.TIF
,FILE58=00000058.TIF
,FILE59=00000059.TIF
,FILE60=00000060.TIF
,FILE61=00000061.TIF
,FILE62=00000062.TIF
,FILE63=00000063.TIF
,FILE64=00000064.TIF
,FILE65=00000065.TIF
,FILE66=00000066.TIF
,FILE67=00000067.TIF
,FILE68=00000068.TIF
,FILE69=00000069.TIF
,FILE70=00000070.TIF
,FILE71=00000071.TIF
,FILE72=00000072.TIF
,FILE73=00000073.TIF
,FILE74=00000074.TIF
,FILE75=00000075.TIF
,FILE76=00000076.TIF
,FILE77=00000077.TIF
,FILE78=00000078.TIF
,FILE79=00000079.TIF
,FILE80=00000080.TIF
,FILE81=00000081.TIF
,FILE82=00000082.TIF
,FILE83=00000083.TIF
,FILE84=00000084.TIF

FILE85=00000085.TIF
,FILE86=00000086.TIF
,FILE87=00000087.TIF
,FILE88=00000088.TIF
,FILE89=00000089.TIF
,FILE90=00000090.TIF
,FILE91=00000091.TIF
,FILE92=00000092.TIF
,FILE93=00000093.TIF
,FILE94=00000094.TIF
,FILE95=00000095.TIF
,FILE96=00000096.TIF
,FILE97=00000097.TIF
,FILE98=00000098.TIF
,FILE99=00000099.TIF
,FILE100=00000100.TIF
,FILE101=00000101.TIF
,FILE102=00000102.TIF
,FILE103=00000103.TIF
,FILE104=00000104.TIF
,FILE105=00000105.TIF
,FILE106=00000106.TIF
,FILE107=00000107.TIF
,FILE108=00000108.TIF
,FILE109=00000109.TIF
,FILE110=00000110.TIF
,FILE111=00000111.TIF
,FILE112=00000112.TIF
,FILE113=00000113.TIF
,FILE114=00000114.TIF
,FILE115=00000115.TIF

FILE116=00000116.TIF
,FILE117=00000117.TIF
,FILE118=00000118.TIF
,FILE119=00000119.TIF
,